# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 13/02/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

## निरंक

# भाग २ - रजा

13 FEB 2020

क्रमांक-पोअय/सआली-5/वा.बा.सं रजा/मपोशी/2475,कासार/2020/ 1995 यवतमाळ दि.

**आदेश**

मपोशी/ 2475,श्वेता कासार ,नेमणुक पोलीस मुख्यालय यांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक.संकीर्ण -2017/प्र.क्र.25/सेवा-6 दि.23.7.2018 अवये शासकीय कर्मचारी यांनी रजेची मागणी केल्याने विनंतीवरुन 60 दिवस वाढीव बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे .

**(मा अपर.पो.अधि.यांचे आदेशान्वये)**

13.2.

(एम.एम.बागवान)
पोलीस उपअधिक्षक (मुख्या)
पोलीस अधिक्षक यवतमाळ करिता

प्रति,

पोनि, राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय यवतमाळ /डिपीजी लिपीक यांना माहीस व योग्य कार्यवाही करीता

प्रत- मपोशी/2475,श्वेता कासार- नेमणुक पोलीस मुख्यालय.

क्रमांक : पोअय/सआली-4/अ.रजा/पो.कर्म./विविध/ 1967 /2019-2020 यवतमाळ दिनांक 12 FEB 2020

आदेश

खालील पोलीस कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कारणास्तव सन 2019-20 करीता मनासे रजा नियम 1981 मधील नियम 50 अन्वये 15/30 दिवस अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.कामाची निकड पाहुन आळीपाळीने रजेवर सोडावे व रजेवर सोडल्याची तारीख या कार्यालयास कळवावी.

| अ.क्र | पो.कर्म.नाव व ब.नं. | नेमणुक | मागीतलेली रजा | मंजुरीचे कारण |
|---|---|---|---|---|
| 1 | पोहवा/1675 शिवाजी राठोड | यवतमाळ ग्रामीण | 15 दिवस | धार्मीक काम |
| 2 | पोशि/1947 अगस्ती पुंडे | पोमु | 15 दिवस | घरबांधणीकरीता |
| 3 | मपोशि/1917 प्रिया मुंदेकर | यवतमाळ शहर | 15 दिवस | धार्मीक काम |
| 4 | पोना/1991 समीर सैय्यद | उमरखेड | 30 दिवस | वैदयकीय तपासणीकरीता |

(पी.जी.शिरस्कर)
.पोलीस उपअधिक्षक मुख्या
पोलीस अधिक्षक यवतमाळ,करिता

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

# भाग ४ - बक्षिस / मानधन

निरंक

क्रमांक:पोअय/डिपी/३१-बी-२/अं.आ.आदेश/पो.नि-जाधव/ 2002 /२०१९ यवतमाळ दिनांक : 13 FEB 2020

संदर्भ :- मा. वि.पो.म.नि यांचे आदेश क्र. अप कक्ष-५/यवतमाळ/पोनि-जाधव/कसुरी/अंआ/२०२०/५७७ अमरावती दि. ०४/०२/२०२०

विषय :- अंतिम आदेश प्रत तामील बाबत.
पो.नि./पितांबर सोव्हालाल जाधव, नेमणुक पो.स्टे. नेर.

***

संदर्भाकिंत विषयान्वये प्राप्त, अंतिम आदेशाची मुळ प्रत स्विकारुन , दुय्यम प्रतीवर दिनांकीत स्वाक्षरी करुन, ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करावी.

सहपत्र : अंतिम आदेश मुळ व दुय्यम प्रत

13.2.
(एम.एम.बागवान )
पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधिक्षक कार्या. यवतमाळ

**प्रति,**

पो.नि/पितांबर सोव्हालाल जाधव, नेमणुक पो.स्टे. नेर

प्रत :- अधिकारी आस्थापना लिपीक/डिपीजी लिपीक यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस्तव.

क्रमांक: अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-जाधव/कसुरी/अंआ/२०२० / 577 अमरावती दि. 04 FEB 202

**वाचा :-** १.पोलीस निरीक्षक, पितांबर सोव्हालाल जाधव नेमणुक, पो.स्टे. नेर जि. यवतमाळ यांचेविरुध्द पोलीस यवतमाळ यांचे पत्र क्र. वाचक/पो.नि. जाधव/कसुरी/२०१९/१३२८ दि. २७.०९.२०१९ अन्वये सादर केलेली कसुरी अहवालाची कागदपत्रे

--- ooo----

**<u>आदेश</u>**

पोलीस निरीक्षक, पितांबर सोव्हालाल जाधव नेमणुक, पो.स्टे. नेर जि. यवतमाळ येथे कार्यरत असतांना खालील प्रमाणे कसुरी केल्याचे आमचे निर्दशनास आणले आहे.

**कसुरी :-**

पोनि/पितांबर जाधव हे पो.स्टे. नेर जि. यवतमाळ येथे ठाणे प्रभारी अधिकारी म्हणुन नेमणुकीस आहेत. दिनांक ३१.०५.२०१९ रोजी पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी पोलीस स्टेशन नेर येथे अचानक भेट दिली असता पोलीस स्टेशनला भाग १ ते ५ चे ७७ गुन्हे नोंद होते. परंतु भाग १ ते ५ चे खतावणी रजिस्टरमध्ये फक्त २६ गुन्हयांची नोंद क्राईम अंमलदार यांनी घेतली होती. उर्वरीत ५१ गुन्हयांची नोंद घेण्यात आलेली नव्हती.

उपरोक्त कसूरी संबधाने पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेकडील पत्र क्र. वाफौ/२८-फ/का.दा.नो./खतवणी नोंद/२०१९/६७१ दिनांक ३१.०५.२०१९ अन्वये पोनि/पितांबर जाधव यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीसचे अनुषंगाने त्यांनी त्यांचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे.

पोलीस निरीक्षक, पितांबर सोव्हालाल जाधव नेमणुक, पो.स्टे. नेर जि. यवतमाळ यांचेविरुध्दचे संक्षिप्त कार्यवाहीचे कागदपत्राचे तसेच त्यांनी सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केले असता त्यांचे स्पष्टीकरण अंशत: समाधानकारक वाटत असल्याने महाराष्ट्र पोलीस अधिनियम सुधारणा २०१३ अधिनियमाचे कलम २५ प्रमाणे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, **मकरंद रानडे** विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>: आदेश :</u>**

पोलीस निरीक्षक, पितांबर सोव्हालाल जाधव नेमणुक, पो.स्टे. नेर जि. यवतमाळ यांना त्यांच्या उक्त कसुरीसाठी **" सक्त ताकीद "** ही शिक्षा देण्यात येत आहे. तसेच भविष्यात त्यांच्याकडुन वरील कसुरीची पुनरावृत्ती होणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी.

सदर शिक्षेविरुध्द अपील अनुज्ञेय नाही.

4.2.2020

( मकरंद रानडे )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रति,

पोलीस निरीक्षक, पितांबर सोव्हालाल जाधव नेमणुक, पो.स्टे. नेर जि. यवतमाळ.

**प्रत व मार्फत:-** पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

२/- सोबत सदर आदेशाच्या ३ प्रती पाठविल्या आहेत. पोलीस निरीक्षक, पितांबर सोव्हालाल जाधव नेमणुक, पो.स्टे. नेर जि. यवतमाळ यांनी सदर आदेशाची मुळ प्रत त्यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करावी. व उर्वरीत प्रत आपले अभिलेखावर ठेवावी.

1956

क्रमांकः-पोअय/सआलि-२/मयत-पोहवा/९९१ वाघमारे /२०२०, यवतमाळ दिनांक

12 FEB 2020

**आदेश**

**पोहवा/९९१,आत्माराम वाघुजी वाघमारे नेमणुक,पो.स्टे. पुसद (शहर) ,** यांचे दिनांक २२.०१.२०२० रोजी अचानक प्रकृती बिघडल्याने लाईफलाईन हॉस्पीटल उपचारा दरम्यान निधन झाल्याने त्यांचे नाव यवतमाळ जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरुन दिनांक २२.०१.२०२० चे म.नं पासुन कमी करण्यात येत आहे.

12-02

**(नूरुल हसन ) भा.पो.से**
प्र.पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

**प्रति,**

ठाणेदार .पो.स्टे. पुसद (शहर)

२/- नमुद पोलीस कर्मचारी यांचा सिक/गैरहजेरी बाबतचा अहवाल प्रलंबित असल्यास तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

**प्रतिलीपीः-**

प्रमुख लिपीक लेखा/प्रमुख लिपीकआस्थापना शाखा/प्रमुख लिपीक पत्रव्यवहार शाखा/ आस्थापना लिपीक /निवृत्ती वेतन लिपीक/भ.नि.नि लिपीक-(३ प्रतित)/वेतन लिपीक-१/वि.चौ लिपीक/प्रवास भत्ता लिपीक / पलि-२,५/७/डिपीजी लिपीक यांना माहितीस व योग्य त्या कार्यवाहिस्तव

# भाग ६ - प्रशिक्षण व इतर

**बिनतारी संदेश**

प्रति - ठाणेदार, पो.स्टे.अवधुतवाडी/दिग्रस/वडगाव जं/यवतमाळ शहर(.)

माहितीस :- उविपोअ- यवतमाळ/दारव्हा

पासुन - पोलीस अधीक्षक, यवतमाळ (.)

क्र. प्रलि/८०-सी/सेवांतर्गत प्रशिक्षण/१००/२०२० यवतमाळ, दिनांक-१३/०२/२०२०

**परिक्षेत्रीय सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत दिनांक १४.०२.२०२० ते १५.०२.२०२०** या कालावधीत **हद्दपार प्रकरणाची कार्यपध्दर्ती** या विषयावरील प्रशिक्षण **मंथन हॉल, अमरावती** येथे आयोजीत करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणाकरीता खालील नमुद पोलीस अधिकारी यांची निवड करण्यात येत असुन त्यांनी साध्या गणवेषात प्रशिक्षणाचे सर्व तयारीनिशी **दिनांक १४.०२.२०२० रोजी सकाळी ०९-०० वा. पावेतो मंथन हॉल, अमरावती येथे** न चुकता हजर राहावे(.) त्याचप्रमाणे निवडण्यात आलेले पोलीस अधिकारी यांना कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षणाकरीता पाठवू /हजर राहू शकत नसल्यास त्यांचेऐवजी संबंधित प्रभारी अधिकारी यांनी त्याच पोलीस स्टेशनमधील अन्य अधिकारी यांना प्रशिक्षणाकरिता पाठवावे (.)

| अ.क्र. | पो.अधिकारी यांचे नांव व पदनाम | नेमणुक | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १ | सपोनि/ राहूल शेजव | पोस्टे. अवधुतवाडी | 8999054878 |
| २ | सपोनि/ विनायक जाधव | पोस्टे. दिग्रस | 9922413211 |
| ५ | पोउपनि/ गिरीष तोगरवाड | पोस्टे.वडगाव जं. | 9923886969 |
| ६ | पोउपनि/ राजेश पुरी | पो.स्टे. यवतमाळ शहर | 9922401985 |

(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)

(पी.के.गिरोलीकर)
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

**प्रत :- प्रभारी अधिकारी, पोलीस नियंत्रण कक्ष.**
**२/- प्रशिक्षणास निवड करण्यात आलेल्या उपरोक्त सर्व पोलीस अधिकारी यांना तात्काळ त्यांचे दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करुन सदर प्रशिक्षणाकरिता हजर राहणेबाबत सुचीत करावे.**

प्रतीलीपी :- गुन्हे देखरेख कक्ष/रा.पो.नि.पो.मु./प्रवास भत्ता लिपीक/प्रशिक्षण लिपीक/डी.पी.जी.लिपीक

**प्रतः-पोलीस अधीक्षक , अमरावती ग्रामीण यांना माहितीकरिता सस्नेह अग्रेषित.**